PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chintu
Year: 2012

Song: John Men Selon
Lyricist: Sandeep Khare

जॉन मेन सेलॉन
जॉन मेन सेलॉन
जॉन मेन सेलॉन
जॉन मेन सेलॉन

आजकाल कुणी
फिरते आहे भवताली
झाडावरती अवकाशी जमिनीखाली
नुसती खसखस येते कानी
कधी फुसफुस फुसफुस
गुरगुरल्यागत घशात कोणी
वा धुसफूस
उघड उघड हे कोणीही
बोलत नाही
पण रात्रीचे कुणी आता
भटकत नाही
रात्री दिसल्या जेव्हा
ज्वाळा कर्दनकाळ
आला आला दहा दिशांनी
हा विक्राळ विक्राळ
विक्राळ विक्राळ
जॉन मेन सेलॉन
जॉन मेन सेलॉन
जॉन मेन सेलॉन
जॉन मेन सेलॉन

खडबडीत असे शरीर
रंगीत शेपूट लय लांब
जरी जरी काट्र्यांची लोखंडी कांब

बारा पायांनी तो
करतो थय थय थय
हत्तीहूनही जाडे पाऊल निःसंशय
याच्यावरती नजर पडे जर कोणाची
त्यांची झोपच हरवून जाते कायमची
डोळं लई क्रूर
इशारी भिरभिरते
आरं निसती त्येच्यावर नजर पडली
की चक्करच येते
तोंडामध्ये अठ्ठेचाळीस दगडी दात
रगडत बसतो
तेच सारखे दिन अन् रात
सदा भुकेले सदा रिकामे वेटखोर
अन् तोंडातून
ज्वाळांचे लोटांवर लोट
खरे सांगतो रामा शपथ
काही न झूट
एका मिनटात त्यो
वाढतोय पंधरा फूट
एका वेळी लाळ गळे
आणि जळतो जाळ
आला आला दहा दिशांनी
हा विक्राळ विक्राळ
विक्राळ विक्राळ

विक्राळ
पाहूनी आहे
अगडबंबसे हिडीस रूप
पक्षी देखील

PlanetRead

Literacy for a Billion

घरट्यामध्ये झाले चुप
कधी न दिसतो
वारा तैसा हा फिरतो
ओ...
माहीत नाही
तो कोणा कोठून बघतो
ओ...
इतका मोठा
तरी न कळते कधी येतो
ओ...
छोट्यांना जो छळतो
त्यांना धरतो
आडवा करतो
केवळ एका थपडीने

तबाह करतो तोंडामधल्या आगीने
दमदाटी कुणी
करायची आता नाही
छोट्यांना कुणी
छळायचे आता नाही
ना खेळू दे जो मुलांस
तो याचा शत्रू
ना हासू दे जो मुलांस
तो याचा शत्रू
पहा टप टपे
त्यांच्यासाठी याची लाळ
लहानग्यांचा मित्र असे
विक्राळ विक्राळ
विक्राळ विक्राळ

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*